दै. पुण्यनगरी दि. २९/०१/२५

# आणखी ५ गुन्हेगार केले तडीपार

## लिंबगाव ठाण्याचा प्रस्ताव मान्य; नांदेड व हिंगोलीतून बाहेर काढणार

**नांदेड/ प्रतिनिधी**

जिल्हा पोलिस दलाने एका टोळीतील आणखी पाच जणांना तडीपार केले आहे. त्यामुळे गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली आहे.

नांदेड जिल्हयातील गुन्हेगारांवर वारंवार प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन सुध्दा त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने अशा गुन्हेगारांना कारागृहात स्थानबध्द तसेच हद्दपार करण्यासंबंधाने पोलिस अधीक्षकांनी ऑपरेशन फ्लश आऊट नुसार कारवाई सुरु आहे.पोलीस ठाणे लिंबगावकडून कलम ५५ महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये एका टोळीतील पाच जणांना हद्दपार करण्याचा प्रस्ताव पोलिस अधीक्षकांना मिळाला होता. त्यामध्ये कायदेशीर चौकशीची प्रक्रिया पूर्ण करुन पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांनी या टोळीतील पाच जणांना नांदेड व हिंगोली जिल्हयाच्या बाहेर सहा महिन्यांसाठी तडीपार करण्याचा आदेश जारी केला आहे. नांदेड जिल्हयातील धोकादायक व्यक्तींना स्थानबध्द करण्याबाबत २०२४-२५ या वर्षात २६ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.पैकी १४ गुन्हेगारांना एमपीडीए कायद्याअंतर्गत एक वर्षासाठी कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे. आणखी पाच जणांना तडीपार करण्यात आले आहे. त्यात सर्जेराव रोहिदास होळपदे २१ रा. करंजी ता. वसमत जि.हिंगोली. देवानंद ऊर्फ लखन बालाजी दुधमोगरे २१ रा. खांडेगाव ता. वसमत. पवन माणिकराव डाखोरे २२ रा. करंजी ता. वसमत जि. हिंगोली.राजू एकनाथ चव्हाण २१ रा. खांडेगाव ता. वसमत जि. हिंगोल. ज्ञानेश्वर शंकरराव साखरे १९ रा. करंजी ता. वसमत जि. हिंगोली यांचा समावेश आहे. याबाबतचे आदेश दि.२७ जानेवारी रोजी पारित करण्यात आले आहेत. सन २०२४-२५ मध्ये कलम ५५ म. पो. का. अन्वये १७ टोळयामधील ५२ इसमांना नांदेड जिल्ह्याचे बाहेर हद्दपार करण्यात आले आहे.तसेच कलम ५६ म.पो. का. अन्वये ०३ इसमांना नांदेड जिल्हयाचे बाहेर तडीपार करण्यात आले आहे.

दै. तरुण भारत

# किनवट माहूर रिक्त पोलीस ठाण्यातील अनुशेष तातडीने भरा; मुख्यमंत्र्यांना आ. केराम यांचे पत्र

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २७ जानेवारी**

किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यात कार्यरत असलेल्या दुर्गम, डोंगराळ भागातील पाच पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचाऱ्यांची जवळपास तीस ते चाळीस टक्के पदे ही रिक्त आहेत.अपुऱ्या संख्याबळामुळे कायदा व सुव्यव्यवस्था टिकऊन ठेवण्यासाठी कसरत होत असुन ही बाब लक्षात घेऊन आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन पोलीस कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्याची मागणी केली आहे.



लोकसंख्या व भौगोलिक दृष्टीने नांदेड जिल्ह्यातील सर्वात मोठे तालुके म्हणून किनवट माहूरची नोंद आहे. हा भाग आदिवासी डोंगराळ व मागास असल्यामुळे दोन्ही तालुक्यात ५ पोलीस ठाणे कार्यान्वित असून प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत ५० ते ६० गावांचा समावेश आहे.

परंतु गेल्या कित्येक दिवसापासून या पाचही पोलीस स्टेशनअंतर्गत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अनेक पदे रिक्त आहेत. किनवट पोलीस ठाण्यात ९५ पदे मंजूर आहेत त्यापैकी केवळ ४९ पोलीस कार्यरत आहेत.इस्लापूर ठाण्यात ५९ मंजूर पदापैकी केवळ २६ कर्मचारी आहेत.मांडवी ठाण्यात ७० पदे मंजूर असताना प्रत्यक्षात २२ कर्मचारी आहेत. माहूर पोलीस ठाणेअंतर्गत ७० पदे मंजूर आहेत परंतु तेथे केवळ ३६ पोलीस कर्मचारी आहेत.सिंदखेड ठाण्यात ४५ पदाची मंजुरी असताना केवळ २३ कर्मचाऱ्यावर संपूर्ण भार आहे.या व्यतिरिक्त उ-४७ रायफलधारी ४५ पदे मंजूर आहेत परंतु १२ हजर आहेत. किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यातील बहुतांश लोकसंख्या जंगलव्यापी दऱ्याखोऱ्यात, वाडी तांड्यात वास्तव्य करून आहे. अशा भागातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने व जनतेच्या रक्षणासाठी अपुऱ्या कर्मचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे.गुन्हेगारी,अवैध धंद्यावर अंकुश ठेवताना तसेच सण उत्सव काळात पोलिसावर बंदोबस्तचा प्रचंड ताण पडतो. रिक्त पदासंदर्भात जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांना अनेकदा तोंडी कळविले परंतु प्रतिसाद मिळाला नसल्याची बाब आ. भीमराव केराम यांनी पत्रात नमूद केली असून पाचही पोलीस ठाण्याअंतर्गत रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्यासाठी संबंधिताना तातडीचे आदेश द्यावेत अशी मागणी त्यांनी केली आहे.